मानक क्र. 102 स्तर : 3

यशवंत कनिष्ठ महाविद्यालय सेलू

शाळा समिती सभा

यशवंत कनिष्ठ महाविद्यालय, सेलू येथील शाळा समितीची सभा मंगळवार दिनांक: १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता सन्माननीय श्री समीरभाऊ देशमुख अध्यक्ष, शाळा समिती यशवंत कनिष्ठ महाविद्यालय, सेलू यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाली. प्रस्तुत सभेला पुढील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१) सन्माननीय श्री. समीरभाऊ सुरेशराव देशमुख
अध्यक्ष, शाळा समिती, यशवंत कनिष्ठ महा, सेलू

२) सन्माननीय श्री. सतिशराव केशवराव राऊत
उपाध्यक्ष, शाळा समिती, यशवंत कनिष्ठ महा, सेलू

३) सन्माननीय श्री सुरेशराव बापुरावजी देशमुख
निमंत्रित सदस्य, शाळा समिती यशवंत कनिष्ठ महा, सेलू

४) सन्माननीय श्री. डॉ. किशोरराव रामचंद्रराव अहेर
सदस्य, शाळा समिती, यशवंत कनिष्ठ महा, सेलू

५) सन्माननीय श्री रणजितराव वसंतराव शिंदे
सदस्य, शाळा समिती, यशवंत कनिष्ठ महा, सेलू

६) सन्माननीय कु. स्मिता व्ही. चुरडे
शिक्षक प्रतिनिधी यशवंत कनिष्ठ महा, सेलू

७) सन्माननीय श्री. डॉ. संदीप पी. डाखे
प्राचार्य तथा सचिव, शाळा समिती यशवंत कनिष्ठ महा, सेलू

अध्यक्ष
शाळा समिती
यशवंत कनिष्ठ महाविद्यालय
सेलू, जि. वर्धा

Scanned with CamScanner

यशवंत कनिष्ठ महाविद्यालय, सेलू
शाळा समिती सभेचे इतिवृत्त

यशवंत कनिष्ठ महाविद्यालय, सेलू येथील शाळा समितीची सभा मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता यशवंत महाविद्यालय, सेलू येथे शाळा समितीचे सन्माननीय अध्यक्ष श्री. समीरभाऊ सुरेशराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

प्रस्तुत सभेतील विषयावर विषयनिहाय चर्चा होऊन पुढील ठराव पारित करण्यात आले.

विषय क्र. १: शाळा समितीच्या शनिवार, दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्तास मंजुरी प्रदान करणे.

ठराव क्र. १: दिनांक ८ मार्च २०२५ रोजी सन्माननीय श्री. समीरभाऊ देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली शाळा समितीची सभा संपन्न झाली. सभेतील विषयपत्रिकेतील विषयांवर सविस्तर चर्चा होऊन जे ठराव पारित करण्यात आले ते इतिवृत्त कायम करण्यात यावे असे सभेत सर्वानुमते ठरविण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. २: यशवंत कनिष्ठ महाविद्यालय, सेलूच्या सन २०२४-२०२५ च्या अंकेक्षण अहवालास (Audit Statement) मंजुरी प्रदान करणेबाबत.

ठराव क्र. २: प्रस्तुत सभेत सन २०२४-२०२५ अंकेक्षण अहवाल (Audit Statement) संदर्भात सर्व सदस्यांनी यथोचित चर्चा केली. त्यानुसार अंकेक्षण अहवालास सर्व सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ३: प्रवेश प्रक्रिया संदर्भात चर्चा करणे.

ठराव क्र. ३: सत्र २०२५-२०२६ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या इयत्ता निहाय सर्व सदस्यांसमोर विशद केली. प्रवेशित विद्यार्थी संख्या समाधानकारक असली तरी पुढील सत्रात विद्यार्थी संख्या वाढविण्याविषयी प्रयत्न करणे आवश्यक आहे. अशा सूचना व्यवस्थापन मंडळ द्वारा शिक्षक व प्राचार्यांना देण्यात आल्या. याविषयी सकारात्मक चर्चेअंती हा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

ठराव सर्वानुमते मंजूर

Scanned with CamScanner

विषय क्र. ४: यशवंत कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या रजा मंजूर करणेबाबत. (दिनांक ०५ मार्च, २०२५ ते ०७ ऑक्टोंबर २०२५) पर्यंत

ठराव क्र. ४: कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक श्री. अमित पी. चिनेवार यांची एक दिवसाची अर्जित रजा, श्री. सुरेश एन. चामचोर यांची एक दिवसाची अर्जित रजा, प्रा. सोनाली ठाकरे यांच्या ८ दिवसाच्या अर्जित रजा तथा प्रा. प्रणिता धापुडे यांच्या २ दिवसांच्या अर्जित रजा यांना सर्व सदस्यांनी मंजूरी प्रदान केली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ५: मा. अध्यक्ष साहेबांच्या अनुमतीने वेळेवर येणारे विषय.

ठराव क्र. ५: मा. अध्यक्ष साहेबांच्या अनुमतीने वेळेवर कोणतेही विषय चर्चेला नसल्यामुळे सन्माननीय सदस्यांचे आभार मानून सभा संपन्न झाली असे जाहीर करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर

[signature]

अध्यक्ष
शाळा समिती
यशवंत कनिष्ठ महाविद्यालय
सेलू, जि. वर्धा

Scanned with CamScanner

मा. क्र. 5.2.1 (102) २०२५ :3

यशवंत कनिष्ठ महाविद्यालय, सेलू
–शिक्षक सभा व इतिवृत्त

## सभेची माहिती

- **दिनांक:** 15 / 06 / 2025
- **वेळ:** दुपारी 03 वाजता
- **स्थळ:** महाविद्यालय सभागृह
- **अध्यक्ष:** डॉ. संदीप भीमराव काळे (प्राचार्य)
- **उपस्थित सदस्य संख्या:** 18

**विषय क्र. १ : मागील सभेच्या इतिवृत्तास मंजुरी प्रदान करण्याबाबत**

**ठराव क्र. १ :**
मागील शिक्षक सभेचे इतिवृत्त सर्व शिक्षकांसमोर वाचून दाखविण्यात आले. त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. कोणत्याही प्रकारची हरकत नोंदविण्यात आली नाही. त्यामुळे सदर इतिवृत्त कायम ठेवण्यात यावे असा ठराव पारित करण्यात आला.
**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**विषय क्र. २ : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्याबाबत**

**ठराव क्र. २ :**
विविध वर्गांच्या निकालाचा आढावा घेण्यात आला. काही विषयांमध्ये विद्यार्थ्यांची प्रगती समाधानकारक नसल्याचे निदर्शनास आले. त्यासाठी विशेष मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.
**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**विषय क्र. ३ : नियमित उपस्थिती वाढविण्याबाबत उपाययोजना**

**ठराव क्र. ३ :**
विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी असल्याबाबत चर्चा करण्यात आली. पालकांशी संपर्क साधणे, सूचना पत्र देणे व उपस्थितीवर लक्ष ठेवणे याबाबत निर्णय घेण्यात आला.
**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

Scanned with CamScanner

## विषय क्र. ४ : सहशालेय उपक्रमांचे नियोजन करण्याबाबत

**ठराव क्र. ४ :**
विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यासाठी समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.
ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

## विषय क्र. ५ : परीक्षा नियोजन व मूल्यमापन प्रक्रिया

**ठराव क्र. ५ :**
आगामी परीक्षांचे वेळापत्रक, प्रश्नपत्रिका तयार करणे व मूल्यमापन प्रक्रिया याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्व शिक्षकांनी नियमानुसार कार्य करावे असा निर्णय घेण्यात आला.
ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

## विषय क्र. ६ : शालेय सुविधा सुधारणा व देखभाल

**ठराव क्र. ६ :**
प्रयोगशाळा, ग्रंथालय व स्वच्छता याबाबत सुधारणा करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला.
ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

## विषय क्र. ७ : विविध विषय (इतर बाबी)

**ठराव क्र. ७ :**
इतर बाबींमध्ये शिक्षकांनी विविध सूचना मांडल्या. त्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनावर भर देणे व शिस्त राखणे यावर विशेष भर देण्यात आला.
ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

## सभेचा समारोप

अध्यक्षांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा समाप्त घोषित केली.

अध्यक्ष सही:

Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya
SELOO, Dist. Wardha

Scanned with CamScanner